# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या वचनपूर्तीच्या कार्यक्रमाला महिलांचा भरघोस प्रतिसाद**
- **मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचे राज्यस्तरीय शुभारंभाचे (वचनपूर्ती कार्यक्रम)**

पुण्यातून थेट प्रक्षेपण मिरा भाईंदर शहरातील नागरिकांना बघण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिके मार्फत iec व्हॅन द्वारे तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, नगरभवन कार्यालयात प्रोजेक्टरवर  करण्यात आले .मिरा भाईंदर शहरामधील सन्माननीय गीता जैन (अध्यक्ष विधानसभा क्षेत्रनिहाय समिती ,विधानसभा मतदारसंघ - मिरा भाईंदर) यांच्या हस्ते योजनेचा लाभ मिळालेल्या पाच लाभार्थी महिलांचा प्रातिनिधिक स्वरूपात सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमांला मिरा भाईंदर शहरातील महिलांनी भरघोस प्रतिसाद दिला.

महिलांचे सक्षमीकरण व आर्थिक स्वातंत्र्यासाठी सदर योजना अतिशय क्रांतिकारी असून माननीय मुख्यमंत्री महोदय महाराष्ट्र शासन आणि दोन्ही उपमुख्यमंत्री महोदय यांचे आमदार गीता जैन यांनी आभार मानून सदर योजनेचा लाभ मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व पात्र महिलांपर्यंत सर्व यंत्रणांनी पोहोचवण्याच्या आवाहन केले. तसेच उपस्थित सर्व महिलांचे  अभिनंदन व कौतुक केले.

सदर कार्यक्रमाला अशासकीय सदस्य श्री मनोज दुबे ,श्रीमती ममता मोराईस , कल्पिता पिंपळे उपायुक्त महिला व बालकल्याण , व्यंकट हुंडेकर बालविकास प्रकल्प अधिकारी , चारुशीला खरपडे महिला बालविकास अधिकारी , कल्पना भोयर मुख्य सेविका महानगरपालिका क्षेत्रातील योजनेचा लाभ मिळालेल्या लाभार्थी महिला आशा आणि अंगणवाडी कार्यकर्ते तसेच मदतनीस बचत गटाच्या महिला उपस्थित होत्या. यावेळी लाभार्थी महिलांनी रक्षाबंधन या सणाच्या आधीच मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेची वचन पूर्ती केल्याने मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांचे विशेष आभार मानले आणि दिलेला शब्द मनापासून पाळल्याने खरंच गोरगरिबांचा मुख्यमंत्री सोबतच सगळ्या लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ म्हणून मनापासून कौतुक ही केले.

आलेल्या सर्व महिलां व प्रमुख पाहुण्याचे आभार प्रदर्शन उपायुक्त श्रीमती कल्पिता पिंपळे मॅडम यांनी करून कार्यक्रमाची सांगता करत अजून हि कोणी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा अर्ज भरला नसेल त्यांनी त्वरित अर्ज भरून या योजनेचा जास्तीत जास्त महिलांनी लाभ घ्यावा असे पुन्हा एकदा आवाहन केले राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वतंत्र,आरोग्य व पोषणामध्ये सुधारणा करणे तसेच कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करणे एवढच या योजनेतून शासनाचे महत्वपूर्ण उद्दिष्टे आहे.आज या योजनेद्वारे महिलांना आर्थिक लाभ होऊन त्या सक्षम होण्यास नक्कीच मदत होईल यात कुठलीही शंका नाही.